शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विव्दत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष तेरावे: अंक सदतीसावा

जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०२४

# मराठी वाङ्मय इतिहासाचे पुनर्लेखन संकल्पना आणि स्वरूप




गांधी एज्यूकेशन सोसायटी, कुंडलचे

**क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल**

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विव्दत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष तेरावे: अंक सदतीसावा

जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०२४

# मराठी वाङ्मय इतिहासाचे पुनर्लेखन संकल्पना आणि स्वरूप

**संपादक**

प्रा. (डॉ.) नंदकुमार मोरे

**संपादक मंडळ**

प्रा. (डॉ.) जयवंत दळवी — डॉ. सुभाष पाटील

डॉ. देवानंद सोनटक्के — डॉ. बळवंत मगदूम

**अतिथी संपादक**

प्रा. (डॉ.) धनंजय होनमाने — डॉ. नवनाथ गुंड

प्रा. (डॉ.) सुरेश शिंदे — प्रा. (डॉ.) संभाजी कदम — डॉ. संपत पार्लेकर

**प्रकाशक**

डॉ. भरत जाधव

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

द्वारकाधीश,साईनगरी, नागठाणे, ता. जि. सातारा– ४१५ ५१९

**मुद्रक**

लक्ष्मी प्रिंटींग प्रेस, कुंडल

ता. पलूस, जि. सांगली– ४१६३०९

हो संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. भरत जाधव यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी लक्ष्मी प्रिंटींग प्रेस, कुंडल येथे छापून द्वारकाधीश, साईनगरी, नागठाणे, ता. जि. सातारा ४१५ ५१९ येथे प्रकाशित केली, या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| वाङ्मयेतिहास: स्वरूप व संकल्पना | प्रा. डॉ. मीनाक्षी देव (निमकर) | १ |
| मराठी वाङ्.मयेतिहास लेखनाचे स्वरूप व मर्यादा | प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर | ६ |
| वाङ्:मयेतिहास संकल्पना आणि पुनर्लेखनाची प्रस्तुतता | प्रा. गुंडोपंत पाटील | १४ |
| वाङ्मयेतिहास: सातत्यपूर्ण पुनर्संशोधन आणि पुनर्लेखनाची आवश्यकता | डॉ. युवराज देवाळे | २७ |
| मराठी साहित्य समीक्षेचा इतिहास | शिल्पा संजय कुंभार | ३३ |
| साहित्येतिहासावरील प्रभाव व प्रेरणा | डॉ. बाळासो आण्णा सुतार | ४० |
| वाङ्मयेतिहासाचे पुनर्लेखन : गरज आणि मर्यादा | डॉ. भरत जाधव | ५० |
| वाङ्मयेतिहासाच्या पुनर्लेखनाची गरज | डॉ. प्राजक्ता प्रल्हादराव निकम | ५७ |
| लोकसाहित्य विषयक लेखनाचा इतिहास | डॉ. अशोक नामदेव शिंदे | ६३ |
| आदिवासी साहित्याचा इतिहास एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. कृष्णा महादू भवारी | ७३ |
| मध्ययुगीन मराठी वाङ्मयेतिहास पुनर्लेखनाची गरज व मर्यादा | मोहिते सुदर्शना मानसिंग | ८० |
| वाङ्मयेतिहासाच्या पुनर्लेखनाची गरज | प्रा. वृषाली सोपान उगले | ९० |
| इतिहास पुनर्लेखनाची संकल्पना | प्रा. (डॉ.) प्रशांत गायकवाड | ९८ |
| बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य आणि मराठी वाङ्मयाचा इतिहास | प्रा. डॉ. उज्ज्वला भोर | १०७ |
| मराठी इतिहासाचे पुनर्लेखन: काही प्रश्न | डॉ. शहाजी ज. पाटील | ११३ |
| मध्ययुगीन कालखंडातील वाङ्मय इतिहासाची सामाजिक प्रेरणा/पार्श्वभूमी | प्रा.डॉ.रमेश पांडुरंग पोळ | ११८ |
| महानुभाव पंथ: सांप्रदायिक दृष्टिकोन आणि वाङ्.मयीन कार्य | डॉ. गवराम नाना पोटे | १२२ |
| मराठीतील आद्य नाटककार : शाहराज भोसले | प्रा.डॉ.धनंजय होनमाने | १२६ |
| तंजावरमधील मराठी नाटकांची परंपरा | डॉ. विनायक शरदचंद्र राऊत | १३३ |

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| मराठीतील मुसलमानी संत वाङ्मयाचा इतिहास | सौ. विजयालक्ष्मी देवगोजी | १४१ |
| वीरशैव मराठी साहित्य | प्रा. डॉ. मांतेश हिरेमठ | १४९ |
| सांप्रदायिक दृष्टिकोन आणि मराठी वाङ्मयाचा इतिहास | प्रा. डॉ.चंदना अनिल लोखंडे | १५७ |
| वंचितांच्या वाङ्मय इतिहास लेखनाची दृष्टी आणि मराठी वाङ्मयाचा इतिहास:- दलित साहित्य | प्रा. शेखर सुभाष खोत | १६१ |
| आदिवासींच्या कथा-कादंबरीचे स्वरूप व वाटचाल | डॉ. भीमराव खं. वानोळे | १७० |
| मराठी भाषांतरित साहित्याचा इतिहास ' | मोहिनी संतोष सावंत | १७७ |
| विज्ञान साहित्याचा इतिहास | डॉ. प्रविणसिंह बहादूरसिंह शिलेदार | १८२ |
| मराठी बाल साहित्याचा इतिहास | प्रा. सदाशिव गंगाधर चुकेवाड | १९० |
| मराठी बालसाहित्याची सद्यस्थिती | डॉ. विनोद कांबळे | १९६ |
| कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण कादंबरी लेखन | प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर | २०३ |
| एकोणिसाव्या शतकातील ख्रिस्ती मराठी नियतकालिकांचा इतिहास | डॉ.महादेव जयसिंग जाधव | २०८ |
| सांगली जिल्ह्यातील दुर्लक्षित शाहीर : बावाखान शेख | प्रा. डॉ. जवाहर लक्ष्मण मोरे | २१६ |
| महात्मा गांधीजींचे वर्धा शिक्षण योजनेतील योगदान | डॉ.राजश्री दिलीप निकम | २२४ |
| दूर्लक्षित मराठी संपादित ग्रंथांच्या वाङ्.मय इतिहासाचे पूनर्लेखन | डॉ. अनंता मच्छिंद्र कस्तुरे | २२९ |
| मराठी वाङ्मयेतिहासातील उपेक्षित लेखिका: सावित्रीबाई फुले | प्रा. स्मिता कोंडिबा कालभूषण | २३८ |
| औंधमधील नाट्यपरंपरा आणि बाळासाहेब पंतप्रतिनिधी | डॉ. नवनाथ गुंड | २४६ |
| आदवासी साहित्याच्या वाटचालीचे स्वरूप | प्रा. दीपककुमार वळवी | २५४ |
| ऐतिहासिक स्त्री व्यक्तिरेखांवरील पोवाडे आणि वाङ्मयेतिहासच्या पुनर्लेखनाची गरज | प्रा. (डॉ.) नीला जोशी | २६२ |
| दीर्घकविता: वाङ्येतिहास दृष्टिक्षेप | नमिता अनिलकुमार पाटील | २७२ |
| मराठवाड्यातील कुणब्याच्या वाताहतीचा हुंकार - अभंग कुणब्याचे व इतर कविता | प्रा. केशव धोंडिबा टिपरसे | २८० |

# कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण कादंबरी लेखन

**प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर**
मराठी विभागप्रमुख,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)

**प्रस्तावना :**

वाङ्मयेतिहास एक शास्त्र आहे. वाङ्मयेतिहास लिहिणे म्हणजे संशोधन, संकलनाच्या पलीकडे अभ्यासकाला जाणे अपेक्षित आहे. वाचकांच्या रसिकांच्या जाणिवेच्या कक्षा वाढवणे,विस्तारित करत राहणे हे वाङ्मयेतिहासाचे ध्येय असायला हवे. वाङ्मय परंपरा आणि वाङ्मयीन संस्कृती यांचे नाते तपासणे हे काम वाङ्मयेतिहास लेखक करीत असतो. वाङ्मयेतिहास पुनर्लेखनाचे हे काम सातत्याने चालणारे काम आहे .

**विषय मांडणी :**

प्रस्तुत लेखात 'कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण कादंबरी लेखन' हा विषय समोर ठेवून वाङ्मयेतिहासाचे पुनर्लेखन करण्याचा प्रयत्न केला आहे. कोल्हापूर जिल्ह्याला साहित्याची अगदी जुनी परंपरा आहे. कोल्हापूर जिल्ह्यात जन्मलेल्या आणि विविध कारणांनी कोल्हापूर जिल्ह्यात वास्तव्य केलेल्या अनेकांनी मराठी वाङ्मयात भर घातली आहे. कोल्हापूर परिसरातील ग्रामीण कादंबरी लेखनात दखल योग्य वृद्धी झालेली आढळते. प्रामुख्याने ग्रामीण कादंबरी लेखनाचा विचार केला तर आनंद यादव, चंद्रकुमार नलगे, मोहन पाटील, राजन गवस, विश्वास पाटील, महादेव मोरे, कृष्णात खोत, किरण गुरव, पांडुरंग कुंभार, द. तु. पाटील या कादंबरी लेखकानी ग्रामीण मराठी कादंबरी लेखनात मोलाची भर घातली आहे.

आनंद यादव यांनी 'गोतावळा' (१९७१) ही पहिली कादंबरी लिहिली. एका शेतगडी म्हणून काम करणाऱ्या तरुणाचे कोल्हापूरी बोलीभाषेत अभिव्यक्त झालेले आत्मप्रकटीकरण या कादंबरीत आहे. आदिम काम प्रेरणांचा शोध घेण्याचा चिंतनशील प्रयत्न म्हणून 'माऊली' या कादंबरीचे स्थान अनन्यसाधारण आहे. 'नटरंग' (१९८०) ही ग्रामीण तमाशा कलावंताच्या उपेक्षित जीवनाचा अविष्कार करणारी कादंबरी आहे. 'नटरंग' ही कादंबरी समकालीन

समाज जीवनाचा दस्ताऐवज ठरतो. 'झोंबी' या आनंद यादव यांच्या कादंबरीला १९९० चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला. 'झोंबी' ( १९८७), 'नांगरणी'(१९९०) , 'घरभिंती' १९९२) आणि 'काचवेल'(१९९७) या कादंबऱ्याच्या रूपाने आनंद यादव यांनी आत्मचरित्रात्मक कादंबरींचा नवा मानदंड निर्माण केला. आत्मचरित्रात्मक कादंबरी असा नवा आकृतीबंध या कादंबऱ्यांनी निर्माण केला.

शंकर खंडू पाटील यांच्या 'घुंगरू', 'बेईमान' या कादंबऱ्या प्रकाशित आहेत. ग्रामीण बोली, ग्रामीण वातावरण त्यांच्या लेखनातून दिसून येते.

चंद्रकुमार नलगे यांनी 'अगिनफुल', 'शहाळी',' काफीला', 'गस्त' आणि 'देवाची साक्ष' त्या कादंबऱ्यांचे लेखन केले. 'देवाची साक्ष' ही धरणग्रस्तांच्या जीवनावरील मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी आहे.

मोहन पाटील यांनी लघुकादंबऱ्या हा वाङ्मय प्रकार हाताळला असून त्यांची प्रयोगक्षमदृष्टी यातून आढळते. बदलते ग्रामीण वास्तव त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून रेखाटले आहे. 'कोंडमारा' आणि 'फुलपाखरू'(१९८४), 'लिगाड 'आणि 'खांदेपालट' (१९९१) या त्यांच्या चार लघुकादंबऱ्या तसेच 'बस्तान '(१९९७) 'साखरफेरा'(२००६) या कादंबऱ्यांनी मराठी ग्रामीण कादंबरी विश्वत भर घातली आहे .'लिगाड 'ही कादंबरी बदलते शेतीचे स्वरूप, ग्रामीण माणूस, निसर्ग या आशय सूत्रात बांधलेली आहे तर 'खांदेपालट' मधून ग्रामीण जीवनातील समस्या मांडल्या आहेत. 'साखरफेरा' कादंबरीमधून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा, साखर प्रश्नांचा गुंता, सहकारातून निर्माण झालेले राजकारण यावर प्रकाश टाकला आहे. 'बांडगुळ आख्यान' या कादंबरीमध्ये घराणेकेंद्रित लोकशाही बरोबरच आक्रमक भांडवलशाहीमुळे निर्माण झालेल्या विपरीत वास्तवाचे चित्रण आहे. खेड्यात उगवलेल्या बांडगुळी राजकारणाचे आणि संस्कृतीचे चित्रण यातून येते.

राजन गवस यांच्या 'तणकट' (१९९९) या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. याबरोबरच राजन गवस यांनी भंडारभोग'(१९८७) 'धिंगाणा'(१९९१),'कळप'(१९९२), 'ब-बळीचा' (२०१३) या कादंबऱ्यांचे लेखन केले. 'चौंडकं' या कादंबरीतून देवाच्या नावावर समाजातील राक्षसीवृत्तींनी निर्माण केलेल्या प्रथेच्या बळी ठरलेल्या देवदासी स्त्रियांची होरपळ मांडली आहे. स्त्री दुःखाचा नेमका वेध घेण्याचा प्रयत्न या कादंबरीतून केला आहे. 'भंडारभोग' ही कादंबरी देवदासी, देवीला जोगते

सोडण्याच्या प्रथेशी निगडित कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये रुढी परंपरेचा बळी ठरलेल्या जोगत्यांच्या जीवनाचा अस्वस्थ करणारा प्रवास शब्दबद्ध केला आहे. 'धिंगाणा' मधील तरुण पदवीधर सभोवतालच्या वास्तवाला शह देण्यासाठी सगळे उपद्व्याप करतो पण त्यातून तो निराळा होतो.

देवदासींच्या व्यथा , देवदासी प्रथा निर्मूलनाचे कार्य तसेच शिक्षण, साहित्य, सहकारी संस्था अशा सामाजिक संस्थात्मक व्यवहारांमध्ये आलेली विकृती राजन गवस यांनी 'कळप' या कादंबरीतून चित्रित केली आहे. 'तणकट' या कादंबरीतून विविध जातीतील नवशिक्षित तरुणांना हतबल करून टाकणारे समकालीन वास्तव मांडले आहे .या कादंबरीतून जागतिकीकरण, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, औद्योगिक आणि शहरीकरणाचा ग्रामीण संस्कृतीवर काय परिणाम झाला याचा आलेख मांडला आहे.

ऐतिहासिक, सामाजिक, ग्रामीण, राजकीय अशा विविध विषयावर कसदार आणि वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी लेखन करणारे लेखक म्हणून विश्वास पाटील यांचा परिचय करून देता येईल. विश्वास पाटील यांनी लिहिलेल्या 'पांगिरा' आणि 'झाडाझडती' या दोन कादंबऱ्यांचे विषय महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाशी निगडित आहेत.

सीमा भागातील शेतकऱ्यांचे, विडी कामगारांचे, फिरस्त्यांचे वास्तव चित्र सकसपणे चित्रित करणारे महादेव मोरे हे लेखक आहेत. 'पाव्हणा', ' रैत' या त्यांच्या कादंबऱ्या अस्सल ग्रामीण बोलीत लिहिलेल्या आहेत. 'झंगाट' आणि 'रानपाखर' या कादंबऱ्यांची पार्श्वभूमी ग्रामीण आहे.

कृष्णात खोत हे २००० सालानंतरच्या कालखंडातील महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत. वर्तमान काळातील परिस्थिती, प्रश्न आणि माणसांच्या जीवन जाणिवावर कादंबऱ्यातून त्यांनी भाष्य केले आहे. 'गावठाण' (२००१), 'रौंदाळा' (२००६), 'झड-झिंबड' ( २०१२), 'धूळमाती' (२०१४), 'रिंगाण' (२०१८) या कादंबऱ्यातून कृष्णात खोत यांनी ग्रामीण भाविश्वातील वेगवेगळे विषय मांडून वाचकाला त्या प्रश्नांच्या मुळाशी नेण्याचा प्रयत्न केला आहे.

'गावठाण' या कादंबरीतून एका शेतकऱ्याच्या घरात जन्मलेल्या काबाडकष्ट करणाऱ्या आयुष्यभर व्यथा आणि वेदना सोसणाऱ्या आंदी या मुलीची करूण कहाणी आली आहे. 'रौंदाळा'मध्ये राजकारणात गुंतलेला खेड्यातला समाज हा प्रमुख विषय असून खेड्यातले अनेक समाजातील गरीब, श्रीमंत लोक

राजकारणाभोवती फिरताना आढळतात. माणसाचं माणूसपणही संपवून टाकणार हे राजकारण खेड्यातल्या स्त्री-पुरुषात, लहान-मोठ्यात कसे भिनले आहे याचे सूक्ष्म आणि सविस्तर चित्रण या कादंबरीतून केले आहे. पाऊस नायक असलेल्या 'झड-झिंबड' या कादंबरीत पावसाचे भयाण रुप पहावयास मिळते. खेड्यातल्या माणसाला पावसाबद्दल नेहमीच आतुरता वाटत असते. पण तोच पाऊस आपले रौद्ररूप दाखवायला सुरुवात करतो त्यावेळी मात्र पाऊस नकोसा वाटतो. माणसाला जीवदान देणारा हा पाऊस माणसाच्या जीवावर उठतो. पाऊस आणि माणसातील ताणतणाव लेखकाने या कादंबरीतून चित्रित केला आहे. निसर्गाच्या नियमियतेला मानवाकडून झालेला अडथळा या महत्त्वपूर्ण प्रश्नाची नोंद कृष्णात खोत या कादंबरीकाराने घेतली आहे.

'धूळमाती' या कादंबरीमध्ये जमीन मालक आणि प्रत्यक्ष शेती करणारा घटक म्हणून कुळ यांच्यातला संघर्ष चित्रित केला आहे. त्याबरोबरच शेती, शेती व्यवहार , शेतीतील उत्पन्न यावरही लेखकाने भाष्य केले आहे.'रिंगाण' या कादंबरीतून धरणग्रस्त म्हणून विस्थापित झालेल्या समाजाला प्रस्थापितांबरोबर रोज संघर्ष करावा लागतो. हा माणसातला सामूहिक पातळीवरचा संघर्ष म्हणता येईल याबरोबरच कादंबरीचा नायक देवाप्पा आणि जंगलातली म्हसरं यांच्यातला संघर्षही पाहायला मिळतो. 'रिंगाण' या कादंबरीमध्ये नायक देवाप्पा हा धरणग्रस्त आहे .यानिमित्ताने धरणग्रस्तांचे प्रश्न, त्यांची होणारी कुचुंबणा यावरही कादंबरीकाराने प्रकाश टाकला आहे.

पांडुरंग कुंभार हे ग्रामीण जीवनातील स्थितीगतीचे वास्तव चित्रण करणारे लेखक आहेत. त्यांच्या 'गावकुस' आणि 'वेगळ्या वाटा' या कादंबऱ्यातून ग्रामीण भाषेचा गोडवा जाणवतो.

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक किरण गुरव यांची 'जुगाड' ही पहिलीच कादंबरी आहे. अभियांत्रिकी शिक्षणातून नवे तंत्रज्ञान आत्मसात केलेल्या पिढीला बेकारीचा सामना करावा लागतो. समाजात वावरताना अपमान आणि घुसमट सहन करत संपूर्ण तरुण पिढीचे यंत्रात रूपांतर होते. अशा परिस्थितीत टिकून राहणे हाच खरा जुगाड असल्याचे कादंबरीकाराने सांगितले आहे .

द.तु.पाटील यांच्या लेखनाला 'चैत'(२०१८) या कादंबरीने प्रारंभ झाला. कोल्हापूर जिल्ह्यातील एका खेडेगावातील यात्रेसंबंधीचे कथानक 'चैत' या कादंबरीत आले आहे. परंपरा सांभाळत खेड्यात होणारे आधुनिक बदल मांडणारी

ही कादंबरी आहे.

**समारोप :**

कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण कादंबरीच्या वाङ्मयेतिहासाचे पुनर्लेखन करताना काही बाबी ध्यानात आल्या त्या पुढीलप्रमाणे मांडल्या आहेत. ग्रामीण कादंबरी लेखनामध्ये आढळणारा महत्त्वाचा विशेष म्हणजे बोलीभाषेचा केलेला वापर होय. कोल्हापूर जिल्ह्यातील हे कादंबरीकार वेगवेगळ्या तालुक्यातील आहेत. त्यामुळे त्यांच्या लेखनातून कोल्हापुरी ग्रामीण बोलीचे वैविध्य जाणवते. साधारणपणे १९६० नंतरच्या काळापासून ते वर्तमान काळापर्यंतच्या या कादंबरीकारांच्या कादंबरी लेखनाचे विषय वैविध्यपूर्ण आहेत. धरणग्रस्त, धरणग्रस्तांचे विस्थापित होणे, शेती, शेतीतील उत्पादन, देवदासी प्रथा, ग्रामीण राजकारण, ग्रामीण तरुणांची बेरोजगारी, ग्रामीण स्त्रीजीवन, अतिवृष्टीचा ग्रामजीवनावर झालेला परिणाम अशा अनेक गोष्टीभोवती फिरणारे या कादंबऱ्यांचे कथानक आहे. कालानुरूप बदलणारे वास्तव, त्या काळातील, त्या परिस्थितीतील जाणवणारे प्रश्न या बाबी या कादंबरीतून जाणवतात. म्हणूनच बदलत्या काळातही टिकून राहणारे नववाचकांना धरून ठेवणारे हे कादंबरी लेखन असल्याचे ध्यानात येते.